# University of Mumbai

परीक्षा विभाग/
वाणिज्य निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई – ४०००९८

क्र.परीक्षा/वाणिज्य निकाल कक्ष/9602/२०१६

**परिपत्रक :—**

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या खालील अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक यांना सुचित करण्यात येते की, ऑक्टो./नोव्हें., २०१६ (द्वितीय सत्र २०१६) मध्ये घेण्यात येणाऱ्या खालील नमुद केलेल्या शिक्षणक्रमाच्या परीक्षा प्रवेश अर्ज mu.ac.in या वेब लिंक वरून Online घेण्यात येणार आहे.

1. M.C.A (Sem-I to VI)(CBSGS) (Other than choice based system of Sem-I)
2. M.C.A Bridge Course (Sem-I to II)(CBSGS)
3. M.M.S. (Sem-III & IV)(CBSGS) (Regular & Repeater) (2014-15 Pattern)

वरील अभ्यासक्रमांचे परीक्षा प्रवेश अर्ज **mu.ac.in ⟶ Exam & Results ⟶ examination ⟶ follow the instructions given on the page** या वेब लिंक वरून Online स्विकारण्याच्या तारखांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :—

| अ.क्र. | परीक्षा शुल्क | विद्यार्थ्यांने **Online** अर्ज भरण्याची, **Inward** करण्याची व महाविद्यालयात त्याची प्रिंट सादर करण्याची तारीख | **Form Submission Report** व विहित शुल्क विद्यापीठात जमा करण्याच्या तारखा |
|---|---|---|---|
| १. | नियमित शुल्क | २०/०९/२०१६ ते ३०/०९/२०१६ | ०५/१०/२०१६ पर्यंत |
| २. | विलंब शुल्क रू. १००/— सहित | ०१/१०/२०१६ ते ०५/१०/२०१६ | ०७/१०/२०१६ पर्यंत |
| ३. | अतिविलंब शुल्क रू. ५००/— सहित | ०६/१०/२०१६ ते १०/१०/२०१६ | १५/१०/२०१६ पर्यंत |

पुढे संबंधीतांना असेही कळविण्यात येते की, वर नमुद केलेल्या तारखांच्या तपशिलाप्रमाणे— संबंधीत विद्यार्थ्यांनी आपले परीक्षाअर्ज mu.ac.in या संकेतस्थळावर Online भरून त्याची प्रिंट घेऊन आवश्यक कागदपत्रांसह महाविद्यालयात जमा करावेत व संबंधीत महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनी Online भरलेले परीक्षाअर्ज आपल्या Login मध्ये Inward करून घ्यावेत व सदर Inward झालेल्या परीक्षाअर्जांचे Form Submission Report काढून तो Report व विहीत परीक्षा शुल्क विद्यापीठाच्या परीक्षा विभागात हस्तेपोच जमा करावेत. पोस्टाने अथवा कुरिअरने पाठविल्यास स्विकारले जाणार नाही. तसेच परीक्षा अर्जांच्या प्रती (Examination Form Prints) विद्यापीठाकडे पाठवू नयेत.

परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्याच्या विलंब शुल्काच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी ०६ वाजता (१०/१०/२०१६ रोजी सायं.६ वा.) Inward Link आपोआप बंद होणार असल्यामुळे परीक्षा अर्ज Inward करता येणार नाहीत व परीक्षा स्विकारण्याची मुदत कोणत्याही परिस्थीतीत वाढवून दिली जाणार नाहीत या बाबींची नोंद घेण्यात यावी.

परीक्षा प्रवेश अर्ज Inward झाल्यानंतर कोणतीही दुरूस्ती करता येणार नाही, यामुळे परीक्षा अर्ज Inward करण्यापूर्वी महाविद्यालयांनी संबंधीत विद्यार्थ्यांचे नांव (इंग्रजी व मराठी या दोन्ही लिपीत), विषय व इतर सर्व माहिती अचुक व बरोबर याची खात्री करून घ्यावी.

जे विद्यार्थी प्रथम सत्र २०१६ च्या परीक्षेस प्रविष्ठ होऊन अनुत्तीर्ण झाले असतील व त्यांनी पुर्नमुल्यांकनासाठी अर्ज सादर केला असेल अश्या विद्यार्थ्यांचे द्वितीय सत्र २०१६ मध्ये होणाऱ्या या परीक्षांसाठीचे परीक्षा प्रवेश अर्ज ( Provisional Basis) त्यांच्या पुर्नमुल्यांकनाच्या निकालाची प्रतिक्षा न करता विहित मुदतीत म्हणजेच संबंधीत परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासून १५ दिवसांच्या आत विहीत शुल्कासहीत सादर करावेत.

ज्या विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र **online** पध्दतीने **Inward** झाले नाही तर त्या विद्यार्थ्यांने आपले परीक्षा आवेदनपत्र पारंपारीक पद्धतीने **(Hard Copy** स्वरूपात) वरील नमुद केलेल्या तारखांच्या वेळापत्रकाप्रमाणे भरून विद्यापीठाकडे पाठवावेत.

तसेच M.C.A (Sem VI)(CBSGS) & M.M.S. (Sem IV)(CBSGS) (Regular) (2014-15 Pattern) या परीक्षेसाठी नियमित म्हणून प्रविष्ठ होणा—या विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कामध्ये रू.२५०/— पदवी प्रमाणपत्र शुल्क भरणे अनिवार्य आहे.

(परीक्षा अर्ज भरताना विद्यार्थ्यांना मराठी (देवनागरी) नाव टाकणे बंधनकारक आहे व तेच नाव त्यांच्या पदवी (Degree) प्रमाणपत्रात छापण्यात येईल. अन्यथा चूक झाल्यास विद्यार्थी जबाबदार राहील.)

टिप्पणीः—

१. M.C.A (Sem-I Fresh) Choice Base System[redacted] अभ्यासक्रमाप्रमाणे परीक्षा प्रवेश अर्ज भरण्याच्या तारखा नंतर जाहिर करण्यात येतील.

तरी या परिपत्रकामध्ये नमुद असलेल्या सर्व बाबींची तंतोतंत पालन करण्यात यावे.

वरील सर्व बाबींची संबंधीतांनी नोंद घेऊन योग्य ती कार्यवाही करावी.

**(Web Link :- mu.ac.in ⟶ Exam & Results ⟶ examination ⟶ follow the instructions given on the page)**

(दीपक वसावे)
स्था. परीक्षा नियंत्रक

स्थळ : मुंबई.
दि. 19 सप्टेंबर, २०१६.

---

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व संबंधीत महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक

अ. प्रत माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषितः—

१. प्रभारी संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, परीक्षा विभाग
२. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग व वित्त व लेखा विभाग
३. सहायक कुलसचिव, रत्नागिरी व ठाणे उपकेंद्र

ब. प्रत माहितीसाठी अग्रेषितः—

१. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ.
२. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ३२.
३. मा. प्र. कुलगुरू, मा. संचालक बीसीयुडी, कुलसचिव व परीक्षा नियत्रंक यांचे स्विय सहायक

(दीपक वसावे)
स्था. परीक्षा नियंत्रक